# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


**प्रेस नोट क्र-३४/२०२५** **दिनांक- २५/०१/२०२५**

## प्रेस नोट

मिरा-भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालया अंतर्गत परिमंडळ-१ अधिनस्त पोलीस ठाणे हद्दीतील मालमत्तेच्या गुन्हाना प्रतिबंध होण्यासाठी मिरा-भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालया अंतर्गत परिमंडळ-१ अधिनस्त काशिमीरा, काशिगांव, मिरारोड, नयानगर, नवघर, भाईंदर, उत्तन पोलीस ठाण्यात दिनांक २३.०१.२०२५ रोजी १८.०० ते २३.०० वा. दरम्यान ऑल आउट कोबिंग ऑपरेशन व नाकाबंदी राबवण्यात आली होती.

मा. श्री. मधुकर पाण्डेय, पोलीस आयुक्त, मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय, मा. श्री. दत्तात्रय शिंदे, अपर पोलीस आयुक्त, मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली मा. श्री. प्रकाश गायकवाड, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१, मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय व परिमंडळ-१ अधिनस्त विभागीय सर्व सहाय्यक पोलीस आयुक्त, पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी व अंमलदार यांनी सदर कारवाईत सहभाग घेतला. ऑल आउट कोबिंग ऑपरेशन दरम्यान ०३ वॉरट मधील आरोपीत यांना अटक करण्यात आले, एन.डी.पी.एस. कायदयान्वये ११ केसेस करण्यात आल्या, ०३ इसमावर सी.आर.पी.सी. १२६ प्रमाणे प्रतिबंधत्मक कारवाई करण्यात आली, दारुबंदी कायद्यान्वये ०१ गुन्हे दाखल करण्यात आले, २८ हिस्ट्रीशिटर तपासले, ०९ गुंड आरोपी चेक केले, १५ विदेशी नागरीक तपासले, ०२ तडीपार इसमाना तपासले असता १ मिळुन आल्याने त्याचेवर महा.पो.अधि.कलम १४२ प्रमाणे कारवाई करण्यात आली, ५३ हॉटेल व लॉजेस तपासले. पो.ठाणे हद्दीत लावण्यात आलेल्या नाकाबंदीत १९८ वाहने तपासाली व २७ वाहनावर मो.वा.कायद्यान्वये कारवाई केली आहे, महाराष्ट्र पोलीस अधिनियम १०२ अन्वये १० कारवाई करण्यात आली, महाराष्ट्र पोलीस







------0000------

लोकमत

# कोम्बिंग ऑपरेशन

## सहा ठिकाणी राबवली मोहीम

## मीरा-भाईंदरमध्ये वाढती गुन्हेगारी, पोलिस अलर्ट

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** गेल्या काही काळात मीरा-भाईंदर वसई-विरार पोलिस आयुक्तालय हद्दीत वाढणारी गुन्हेगारी पाहता मीरा भाईंदरमध्ये पोलिसांनी विविध ठिकाणी ऑल आउट कोम्बिंग ऑपरेशन आणि नाकाबंदी केली. या कोम्बिंग ऑपरेशनदरम्यान त्यांनी अनेकांवर कारवाई केली. पोलिस उपायुक्त प्रकाश गायकवाड यांनी स्वत: कारवाईत सहभागी होत तपासण्या केल्या.

मीरा भाईंदर परिमंडळ १ मधील गुन्ह्यांना प्रतिबंध करण्यासह गुन्हेगारी प्रवृत्तींना जरब बसावी म्हणून शहरातील काशिमीरा, काशिगाव, मीरा रोड, नयानगर, नवघर, भाईंदर व उत्तन या सहा पोलिस ठाण्यांच्या हद्दीत २३ जानेवारीच्या रात्री ६ ते ११ वाजेच्यादरम्यान ऑल आउट कोम्बिंग ऑपरेशन व नाकाबंदी राबवली गेली होती. यावेळी काही आरोपींना अटक केली तर काहींवर प्रतिबंधात्मक कारवाई केली.



मीरा-भाईंदरमधील कोम्बिंग ऑपरेशनदरम्यान तपासणी करताना पोलिस अधिकारी.

**९ जणांना अटक**

पेल्हार पोलिसांनी धानिवबागच्या गांगडीपाडा येथील भागवत बिल्डिंगमधून शनिवारी संध्याकाळी नऊ बांगलादेशींना पकडले. नूरजलाल मोल्ला (४२), राखी मोल्ला ऊर्फ तंजीला खातून (२७), मालती मिस्त्री (४२), अकलिमा विश्वास (३५), रत्ना मोल्ला ऊर्फ आशा शिंदे (४०), जावेदुल शेख (३८), रुबी खातून (३५), फातिमा शेख (४०) आणि दिलरुबा चौहान (४५) हे नऊ जण पारपत्राशिवाय बांगलादेशातून भारतामध्ये प्रवेश करून पेल्हार पोलिस ठाण्याच्या हद्दीत बेकायदेशीर वास्तव्य करताना आढळले.

**विविध गुन्ह्यांमध्ये कारवाई**

या ऑपरेशनदरम्यान वॉरंटमधील ३ आरोपींना अटक करण्यात आली. अमली पदार्थांचे सेवन करणाऱ्यांवर ११ गुन्हे दाखल केले गेले. ३ जणांवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली. दारूबंदी कायद्यान्वये १ गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी २८ हिस्ट्रीशिटर व ९ गुंड आरोपी यांची तपासणी केली.

## नाकाबंदीत वाहने तपासली, ३७ जणांवर कारवाई

**१** अवैधपणे घुसखोरी करून भारतात राहणाऱ्या बांगलादेशी नागरिकांचा मुद्दा सध्या चर्चेत आहे. त्यादृष्टीने बांगलादेशी नागरिक तर शहरात नाहीत ना यासाठी झोपडपट्ट्यांमध्ये चौकशी केली गेली.

**२** १५ विदेशी नागरिकांची तपासणी केली. २ तडीपार जणांची तपासणी केली असता त्यात एकजण हद्दीत सापडल्याने त्याच्यावर फौजदारी कारवाई केली. शहरातील ५३ ऑर्केस्ट्राबार - हॉटेल व लॉजेस यांची तपासणी केली गेली.

**३** नाकाबंदीत १९८ वाहनांची तपासणीसह २७ वाहनांवर मोटार वाहतूक कायद्यानुसार तर १० जणांवर महाराष्ट्र पोलिस अधिनियमनुसार पोलिसांनी कारवाई केली.

**४** पोलिस आयुक्त मधुकर पाण्डेय व अपर पोलिस आयुक्त दत्तात्रय शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली उपायुक्त प्रकाश गायकवाड यांच्यासह विभागीय सहायक पोलिस आयुक्त, पोलिस ठाणे प्रभारी अधिकारी व अंमलदार हे कारवाईत सहभागी झाले होते.